महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरणांर्तगत बांधकाम व इतर सोयी सुविधा यासाठी अर्थसंकल्पिय तरतूदीतून निधी वितरीत करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

गृह विभाग

शासन निर्णय क्र.एसटीसी-१११८/प्र.क्र.५९३/परि-१

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : ३० मार्च, २०१९.

वाचा :-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे पत्र क्र.राप/स्थाअ/कामे/५७०६, दि.१६.११.२०१८.

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे बांधकाम/दर्जावाढ व आधुनिकीकरणाकरीता शासनाद्वारे महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान देण्यात येते. त्यानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे आधुनिकीकरण, बांधकाम, विस्तारीकरण, दर्जावाढ या योजनेअंतर्गत सन २०१८-१९ करीता रु.४०.०० कोटी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. सदर बाब लक्षात घेवून महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने संदर्भाधिन दि.१६.११.२०१८ च्या पत्रान्वये सन २०१८-१९ या वर्षाकरीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या आधुनिकीकरण, बांधकाम, विस्तारीकरण, दर्जावाढ यासाठीच्या कामांसाठी रु.४०.०० कोटी निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांचे बांधकाम/ आधुनिकीकरण/ विस्तारीकरण पुर्नबांधणी व दर्जावाढ याकरीता सन २०१८-१९ या वर्षाकरीता रु.४०.०० कोटी (रुपये चाळीस कोटी फक्त) निधी वितरीत करण्यात येत आहे.

२. सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षाकरिता “मागणी क्र. बी-३, लेखाशिर्ष ३०५५, मार्ग व परिवहन, १९०, सार्वजनिक क्षेत्रातील इतर उपक्रमांना सहाय्य (००) (०१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांच्या आधुनिकीकरणांर्तगत बांधकाम व इतर सोयी सुविधा (३०५५ ००५२)” ३५, भांडवली मत्तेच्या निर्मितीकरीता अनुदान या लेखाशिर्षाखालील तरतुदीमधून भागविण्यात यावा.

३. सदर निधी वितरीत करण्यासाठी परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांच्या कार्यालयातील आहरण व संवितरण आधिकारी यांनी सदर रक्कम आहरित करुन महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळास अदा करण्याची कार्यवाही करावी.

४. सदर निधीचा विनियोग करताना लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०१९ आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही याची महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने दक्षता घ्यावी.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१२५/२०१९/व्यय-८, दि.२७.०३.२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३३०१७५६५७२३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Meghana Gaurav Shinde

Digitally signed by Meghana Gaurav Shinde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Food Civil Supply and Consumer Protection Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d29224e30812c4523eedb32c54f5cbc27548f81ccf656192b6d735115af1dfb8, serialNumber=d625cf85c370bb4c35f332d5f951f0a9cd61fad5ddf056809a969bfdd9fdb7da, cn=Meghana Gaurav Shinde
Date: 2019.03.31 15:07:20 +05'30'

(मेघना गौरव शिंदे)

कार्यासन अधिकारी, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा. मंत्री/राज्यमंत्री (परिवहन) यांचे खाजगी सचिव.
३. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई
४. परिवहन आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
५. महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परिक्षण), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर
६. महालेखापाल (वाणिज्यिक लेखा परिक्षा), मुंबई
७. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
८. निवासी लेखा परिक्षण अधिकारी, मुंबई
९. वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई.
१०.नियोजन विभाग (का-१४६१), मंत्रालय, मुंबई.
११.वित्त विभाग (व्यय -८/साऊ/अर्थसंकल्प-१०/अर्थोपाय) विनियम, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
१२.गृह विभाग (बीयुडी-१/बीयुडी-२/परिवहन-३/परिवहन-४), मंत्रालय, मुंबई
१३.निवडनस्ती (परिवहन-१)